वैधानिक लेखापरीक्षक २०१९-२०


# एस.डी.साटम आणि कं.

**चार्टर्ड अकौंटंटस**

**सी-२००३, स्टेशन प्लाझा, स्टेशन रोड, भांडुप (प.), मुंबई - ४०० ०७८.**

**भ्रमणध्वनी क्र. - ९८२०४९६०८१ / ९८२०६४१९३६**


---

दि.१९/०९/२०२०

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी आणि सचिव,
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.
भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव-वडाळा रोड,
मुंबई - ४०० ०३१.

**विषय : ३१ मार्च,२०२० या अखेरचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणेबाबत.**

महोदया,

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. या संस्थेच्या हिशेबांचे फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांकडून लेखापरीक्षणावेळी पुरवलेल्या माहितीच्याआधारे (तोंडी व लेखी) लेखापरीक्षण करण्यात आले आहे. वर नमूद कालावधीत संस्थेचा ताळेबंद व आयव्यय पत्रकांचे परीक्षण करण्यात येवून त्यात आढळलेली निरीक्षणे व विसंगती तसेच फेडरेशनचा व्यवहार इ. लेखापरीक्षण अहवालात हरकती तथा साधारण शेऱ्यामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

संस्थेचे दि.१ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च,२०२०या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करण्यात येवून अहवाल पुढील माहिती पत्रकांसहित सोबत जोडण्यात आला आहे.

१. आयव्यय पत्रक आणि ताळेबंद पत्रक
२. लेखापरीक्षकाची प्रमाणपत्रे, फेडरेशनच्या सद्यस्थितीबद्दल थोडक्यात प्रस्तावना व टिप्पणी, लेखापरीक्षण हरकती, निरीक्षणे, सर्वसाधारण शेरे व फेडरेशनच्या इतर अनिवार्य तपशीलांसह लेखापरीक्षकांचा अहवाल.
३. नमुना क्र.१ मध्ये लेखापरीक्षण मेमोरँडम

सदर अहवालात नमूद केलेल्या दोषांची पूर्तता तसेच दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करुन महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८२ व नियम ७३ प्रमाणे 'ओ' नमुन्यात संचालक मंडळाच्या ठरावासह तीन प्रतीत सदर अहवाल मिळालेपासून ३ महिन्यांचे आत मा.निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास न चुकता सादर करावा, ही विनंती.

आपला आभारी,

पॅनल नं.१७२५७
For S. D. SATAM & Co.
CHARTERED ACCOUNTANTS
F.R. No.118302W

S. D. SATAM & Co. * Chartered Accountants * M. No. 104904 MUMBAI

Santosh D. Satam
Proprietor

नमुना क्र. एन-२

[ कलम ८१ आणि नियम ६९(३) पहा ]

# स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी आणि सचिव,
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.
भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव-वडाळा रोड,
मुंबई - ४०० ०३१.

## वैधानिक लेखापरीक्षकाचा आर्थिक हिशेबपत्रकांवर अहवाल

१. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँकेच्या फेडरेशन लि. या संस्थेच्या दि.३१ मार्च,२०२० अखेरच्या ताळेबंद व आयव्यय पत्रकासहीत हिशेबपत्रकांचे लेखापरीक्षण आम्ही पूर्ण केले असून दि.१ एप्रिल,२०१९ ते ३१ मार्च,२०२० या कालावधीत लेखापरीक्षण केलेल्या हिशेबपत्रकात महत्त्वपूर्ण हिशेबविषयक धोरणे आणि अन्य स्पष्टीकरणयुक्त माहितीचा सारांश समाविष्ट करण्यात आला आहे.

## आर्थिक हिशेबपत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार ही आर्थिक हिशेबपत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनावर आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये फसवणूक वा चुकीमुळे महत्त्वाच्या गैरविधानांमधून मुक्त असलेली आर्थिक हिशेबपत्रके बनविण्याशी निगडीत असलेली अंतर्गत नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल इ.चा समावेश आहे.

## लेखापरीक्षकाची जबाबदारी

३. आमच्या लेखापरीक्षणाच्याआधारे या आर्थिक हिशेबपत्रकांवर मत व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे. आम्ही भारतीय लेखा परीक्षकांच्या चार्टर्ड अकाउंटंट्सना लागू मानकांनुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गतील तरतूदींच्या अधीन राहून आमचे लेखापरीखण केले आहे. सदर मानांकनानुसार आम्ही नैतिक धोरणांचे पालन करणे व संस्थेची आर्थिक हिशेबपत्रके महत्त्वाच्या गैरविधानांपासून मुक्त आहेत की नाहीत याबाबत वाजवी खात्री करुन आमच्या लेखापरीक्षणाचे नियोजन आणि पालन करणे जरुरीचे आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

४. आर्थिक हिशेबपत्रकात नमूद रक्कमा व त्यांचे सादरीकरण यासंदर्भात लेखापरीक्षण पुरावे मिळविण्यासाठी एक विशिष्ट कार्यपद्धत लेखापरीक्षणात समाविष्ट असते. ही निवडलेली कार्यपद्धत लेखापरीक्षकाच्या मतांवर आधारित असून त्यात हिशेबपत्रकात नमूद फसवणूक वा चूकीमुळे झालेल्या महत्त्वाच्या गैरविधानांच्या जोखमीच्या मूल्यांकनाचा समावेश आहे. परिस्थितीनुसार लेखापरीक्षणाची कार्यपद्धत ठरवताना, लेखापरीक्षक संस्थेची हिशेबपत्रके तयार करतेवेळी वा त्याच्या सादरीकरणाशी निगडीत अंतर्गत नियंत्रण यंत्रणावर अवलंबून राहतात. लेखा परीक्षणामध्ये हिशेबांच्या धोरणांची योग्यता आणि व्यवस्थापनाने केलेल्या हिशेबांच्या अंदाजपत्रकाच्या वाजवीपणाचे मूल्यांकन तसेच आर्थिक हिशेबपत्रकांच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यांकन यांचा समावेश आहे.

५. आम्हांस विश्वास आहे की, लेखापरीक्षणासाठी आम्ही मिळविलेला पुरावा आमच्या लेखापरीक्षणाला आधार देण्यासाठी पुरेसा व योग्य आहे.

**मत**

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि आम्हांला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार सदर हिशेब पत्रके व त्यातील मुद्दे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू असलेले कायदे व निबंधकाकडून जारी करण्यात आलेली परिपत्रकानुसार भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या हिशेबतत्त्वांनुरुप संस्थेला आवश्यक असलेल्या पद्धतीनुसार वास्तववादी व योग्य स्वरुप दर्शवितात.

(*i*) ताळेबंदाच्या बाबतीत ३१ मार्च,२०२० पर्यंत संस्थेच्या कारभाराची स्थिती;

(*ii*) आयव्यय पत्रकाच्या बाबतीत दि.३१ मार्च,२०२० अखेर खर्चापेक्षा जास्त असलेले उत्पन्न.

**इतर कायदेशीर आणि नियामकीय बाबींवर अहवाल :**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतूदीनुसार ताळेबंद आणि उत्पन्न आणि आयव्यय पत्रक तयार करण्यात आले आहे.

८. **आम्ही निरीक्षण नोंदवितो की:**

(अ) आमचे ज्ञान आणि विश्वासानुसार आमच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्हांला मिळालेले असून ते समाधानकारक आहे.

(ब) आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे व्यवहार हे संस्थेच्या अधिकार कक्षेत आहेत.

(क) संस्थेचे कार्यालय आणि शाखा येथून मिळालेली माहिती आमच्या लेखापरीक्षणाच्यादृष्टीने पुरेशी आहे.

९. आमच्या मते ताळेबंद आणि आयव्यय पत्रक हिशेब मानकांचे पालन करते.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI ★ CHARTERED ACCOUNTANTS ★

१०. आम्ही पुढीलप्रमाणे अहवाल सादर करतो की :

(*i*) या अहवालाशी निगडीत असलेला ताळेबंद व आयव्यय पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी व पत्रकांशी जुळता आहे.

(*ii*) आमच्या मते व आम्ही केलेल्या हिशोबी पुस्तकांच्या परीक्षणानुसार संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा व नियम तथा संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असणारी हिशोबी पत्रके योग्यरितीने ठेवली आहेत.

(*iii*) शाखा लेखा परीक्षकांनी केलेल्या शाखांच्या हिशेबांच्या अहवालानुसार आम्ही आमचा अहवाल आम्हाला योग्य वाटेल अशा पद्धतीने तयार केला आहे.

(*iv*) सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी संस्थेला 'अ' वर्गीकरण देण्यात आला आहे.

ठिकाण : मुंबई

तारीख : १९.०९.२०२०

यूडीआयएन : 20104904AAAAOA7643

**मेसर्स एस.डी.साटम एण्ड कं.**

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

चार्टर्ड अकौंटंट

**(सीए संतोष साटम)**

M.No.104904

पॅनल क्र.१७२५७

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.

## लेखा परीक्षण अहवाल

## २०१९-२०

## भाग-अ

## सामान्य निरीक्षणे आणि शेरे

**१.०० प्रस्तावना :-**

- दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि. (यानंतर 'फेडरेशन' म्हणून ओळखली जाईल) ची नोंदणी दि.९ मार्च,१९७९ रोजी (नोंदणी क्रमांक BOM/GNL/8/1979) झाली असून संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय, भारतीय क्रीडा मंदिर, चौथा मजला, नायगाव, वडाळा रोड, मुंबई-४०० ०३१ येथे आहे. फेडरेशनचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे. फेडरेशनला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदी व नियम लागू आहेत.

- आपले दि.२५ सप्टेंबर,२०१९ चे पत्र क्र.२३२/ वैधानिक लेखापरीक्षण/२०१९-२० द्वारे दि.०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० या कालावधीसाठी फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी आमच्या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षण आम्हाला देण्यात आलेल्या पुस्तकी नोंदी व संबंधीत माहितीच्या आधारे करण्यात आले आहे.

- फेडरेशनच्या आर्थिक व्यवहारांची सत्य व वास्तव स्थिती दर्शविणारी आर्थिक हिशेबपत्रके तयार करण्याची जबाबदारी फेडरेशनच्या व्यवस्थापनाची राहील. आमची जबाबदारी ही लेखापरीक्षणाच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या हिशेबपत्रकांवर मत व्यक्त करणे ही आहे. भारतीय वैधानिक लेखापरीक्षण संस्थेने जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार चाचणी, तपासणी आधारावर आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण पूर्ण केले आहे.

**२.०० उद्देश :-**

**फेडरेशनची उद्दीष्टे -**

i) महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या कामकाजाशी समन्वय साधणे आणि सक्षम व पुरोगामी बँकिंग तत्त्वांचा प्रचार व प्रसार करणे व त्यात समानता आणणे.

ii) सभासद बँकांना आर्थिक तथा कायदेशीर आणि बँकिंगविषयक तसेच समान हिताच्या बाबींमध्ये सल्ला देणे.

iii) स्वत: अथवा भारतीय रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक किंवा इतर कोणत्याही संस्थेमार्फत सभासद बँका आणि संघटनांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

iv) नागरी सहकारी बँकांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावर योग्य त्या उपाययोजना करणेकरिता तसेच फेडरेशनच्या भूमिकेचे समर्थन करण्याकरिता परिषदा, सेमिनार्स, परिसंवाद आणि अभ्यास गट आयोजित करणे.

v) महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांच्या निकोप वाढीसाठी आणि संस्थेच्या उत्कर्षाकरिता संशोधन प्रकल्पांचे आयोजन करणे आणि नागरी सहकारी बँकांशी निगडीत विविध विषयांचा अभ्यास करणे.

vi) बँकांकडून वेळोवेळी त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतची निवेदने व माहिती, त्यांच्या प्रसाराची, देवाणघेवाणाची व प्रकाशनाची व्यवस्था करणे.

vii) ज्ञानाचे भांडार म्हणून कार्य करणे आणि राज्यातील नागरी सहकारी बँकिंग प्रणालीची कार्यपद्धती, संघटनात्मक रचना व वित्तीय व्यवहार यांची बँकाकडून माहिती घेणे.

viii) नागरी सहकारी बँकांशी निगडीत इतर कोणतीही हिताची माहिती व मते यांची देवाणघेवाण करणे.

ix) नागरी सहकारी बँकिंग चळवळीतील सर्जनशीलता आणि विकासासाठी असलेल्या व्याप्ती, महती आणि क्रियाप्रकल्पांसंदर्भात सकारात्मक जनमत तयार करण्यासाठी त्यांना पुरेशी प्रसिद्धी देणे.

x) खालील संस्था/आस्थापना यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवून व त्यांचेकडून प्राप्त झालेली माहिती सभासद बँकांना त्यांच्या हिताच्या दृष्टीने पुरविणे.

१. रिझर्व्ह बँकेशी संबंधित सर्व विभाग

२. सहकार आयुक्त व सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व राज्य सरकारचे संबंधित सर्व अधिकारी

३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई आणि अशा इतर संस्था

xi) पुरेसा राखीव निधी व वैधानिक तरलता निधी राखणे इ. संदर्भात वैधानिक जबाबदारींची पूर्तता सभासद बँकांकडून करणेसंदर्भात आवश्यक ती पावले उचलणे.

xii) सभासद बँकांना त्यांच्या विनंतीनुसार भेटी देण्याची व्यवस्था करणे आणि बँका व कर्मचारी संघटना यांचेत झालेल्या तडजोडी वा निकालांची अंमलबजावणी व त्याचे स्पष्टीकरण इ. संदर्भात सभासद बँकांना सल्ला देणे.

xiii) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार शासन व निबंधक यांनी निर्गमीत केलेले आदेश, जबाबदाऱ्या योग्यप्रकारे पार पाडणे व त्याप्रमाणे हस्तांतरीत केलेल्या अधिकारांचा योग्यरित्या वापर करणे.

xiv) राज्यातील सहकारी, वित्त आणि बँकिंगच्या संरचनेचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यानुरुप सभासद बँकांना आणि/किंवा राज्य सरकार व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या शिफारसी करणे.

xv) फेडरेशनची उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी चेंबर्स ऑफ कॉमर्स, विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्था तसेच भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ संचलित सहकारी प्रशिक्षण महाविद्यालये तसेच अन्य राज्यस्तरीय संघीय संस्था व संचालक मंडळाने ठरविलेल्या इतर संस्थांशी समन्वय व संपर्क राखणे.

xvi) फेडरेशनच्या विकासात्मक कामांसाठी निधी उभारणे वा कर्ज घेणे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

xvii) सर्व नागरी सहकारी बँकांना सहाय्य, सल्ला व मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुनर्वसन अंतर्गत वर्गीकृत केलेल्या बँका तसेच दुर्बल व महिला सहकारी बँकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी, त्यांच्या अडचणी आणि गरजा जाणून घेऊन त्यावर विशेष लक्ष देवून त्यांना पुनर्जिवीत करण्यासाठी मदत करणे.

xviii) नागरी सहकारी बँकांना सहकार, बँकिंग कायदा व तत्सम बाबींशी निगडीत नवीन होणाऱ्या सुधारणांची माहिती करुन देण्यासाठी वार्तापत्र प्रसिद्ध करणे.

xix) सभासद नागरी सहकारी बँकांना कार्यक्षम व उत्तम व्यवस्थापन करणे सुलभ व्हावे याकरिता त्यांच्या विनंतीनुसार कर्मचारी सेवा नियम, स्थायी आदेश, वेतन करार करणेकरिता तसेच इतर तत्सम बाबींमध्ये सहाय्य करणे व योग्य त्या अधिकृत मंडळासमोर त्यांची बाजू मांडणे.

xx) सभासदांना सहकार व बँकिंग विषयाशी निगडीत शिक्षण व प्रशिक्षण प्रदान करणे.

xxi) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' म्हणून काम करणे.

xxii) नागरी सहकारी बँकांकरिता नोकर भरती, निवड, मुलाखत व पदोन्नती कार्यक्रम आयोजित करणे.

## ३.०० सामान्य निरीक्षणे आणि शेरे :

### १) लेखा परीक्षण माहिती :

- मेसर्स एस.डी साटम आणि कं. चार्टर्ड अकौंटंट, वैधानिक लेखापरीक्षक, मुंबई यांनी दि.०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीसाठी फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षण दि.९/०७/२०२० रोजी सुरू केले व त्याची पूर्तता दि.३१.०७.२०२० रोजी झाली.
- आमच्यासमोर सादर केलेल्या रेकॉर्ड आणि संबंधित माहितीच्या आधारे संस्थेचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

### २) सदस्य बँका :

**सदस्य बँकांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :**

| क्र. | तपशील | ३१.०३.२०२० रोजी | ३१.०३.२०१९ रोजी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा व विभागीय सहकारी बँकांच्या संघटना | १८ | १८ | -- | -- |
| २. | नागरी सहकारी बँका | ४८२ | ४८२ | २ | (२) |
| ३. | सहयोगी सभासद बँक | १ | १ | | |
| | **एकूण** | ५०१ | ५०१ | २ | (२) |

- सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात जनता कमर्शिअल सहकारी बँक, खामगाव या बँकेचे चिखली अर्बन को-ऑप. बँकेत आणि आर. एस. को-ऑप. बँक, मुंबई या बँकेचे मेहसाना अर्बन को-ऑप. बँक, मेहसाना, गुजरात या बँकेत विलीनीकरण झाले. तसेच वर्षभरात खालील बँका नवीन सदस्य बँका म्हणून फेडरेशनच्या सभासद बँकांच्या यादीत समाविष्ट झाल्या आहेत.
  - ➢ पुणे सहकारी बँक लि., पुणे
  - ➢ इचलकरंजी मर्चंटस् को-ऑप. बँक, कोल्हापूर

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

अ) **सभासद नोंदणी अर्ज :**

सभासदांच्या नोंदणी अर्जाची तपासणी करण्यात आली व ती योग्य आढळली. (संचालक मंडळाच्या सभेत ठराव संमत करून सभासदांची थेट नेमणूक केली जाते.)

ब) **'जे' फॉर्म रजिस्टर :**

- फेडरेशनने 'जे' फॉर्म रजिस्टर ठेवले आहे. सभासदांची नावे, पत्ते इ. बाबतचा तपशील रजिस्टरमध्ये योग्यरित्या नमूद केलेला आहे.
- उपविधीनुसार फेडरेशनला त्यांच्या सभासदांना 'भाग' देता येत नाहीत.
- फेडरेशन सभासदांकडून प्रवेश शुल्क म्हणून प्रति सदस्य रु.५००/- स्वीकारत आहे.
- वर्षाच्या शेवटी प्रवेश शुल्काद्वारे प्राप्त झालेली एकूण रक्कम राखीव निधीत वर्ग केली आहे.

३) **कर्ज आणि आगाऊ :**

आर्थिक वर्षात फेडरेशनने कोणतेही बाह्य कर्ज घेतलेले नाही.

४) **सभा आणि इतिवृत्त रजिस्टर :**

अ) **वार्षिक सर्वसाधारण सभा :**

आर्थिक वर्षात फेडरेशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२४ सप्टेंबर,२०१९ रोजी दुपारी २.३० वाजता घेण्यात आली. सदर सभेच्या इतिवृत्ताची रीतसर नोंद ठेवण्यात आली आहे. सदर सभेत चर्चीले गेलेले मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे:

- दि.३१ मार्च,२०१९ रोजीचे आयपत्रक व ताळेबंदास मान्यता देणे.
- सन २०१८-१९ मध्ये फेडरेशनने रु.७,३६,४१३.२७ चा निव्वळ वाढावा प्राप्त केला होता.
- सदर रु.७,३६,४१३.२७ च्या वाढाव्याचे विनियोजन खालीलप्रमाणे आहे.

| **तपशील** | **रक्कम (रु.)** |
|---|---|
| राखीव निधी | १,८४,११०.०० |
| इमारत व विकास निधी | १,५०,०००.०० |
| अप्रत्याशित आणि आकस्मिक दायित्व निधी | १,५०,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युईटी निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | १,५२,०००.०० |
| पुढील शिल्लक | ३०३.२७ |
| **एकूण** | **७,३६,४१३.२७** |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

**ब)** **संचालक मंडळ सभा :**

- आर्थिक वर्षात ५ संचालक मंडळ सभा व २ उपसमिती सभा घेण्यात आल्या.
- संचालक मंडळ सभेची इतिवृत्ते योग्य रितीने लिहिलेली आणि स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवलेली आहेत.

**५)** **वैधानिक पूर्तता**

- फेडरेशनने दि.१७-०६-२०१९ रोजी सन २०१८-१९ च्या लेखापरीक्षण अहवालावर दोषदुरुस्ती अहवाल 'नमुना ओ'मध्ये तयार करुन निबंधकास सादर केला आहे.

**६)** **वैधानिक लेखापरीक्षकाचे शुल्क -**

फेडरेशनने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षणाचे शुल्क रक्कम रु.७,९६८/- (जीएसटी वगळता) अदा केले आहे.

**७)** **नोंदवही (रजिस्टर्स):**

**आम्ही खालील रजिस्टर्स तपासली असून आमची निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत :**

| क्र. | नोंदणीचे नाव | निरीक्षण |
|---|---|---|
| १. | गुंतवणूकीची नोंदवही | नोंदवही व्यवस्थित व अद्यावत ठेवण्यात आली आहे. |
| २. | रजेची नोंदवही | नोंदवही संगणक प्रणालीमध्ये योग्यरित्या व अद्यावत राखण्यात आली आहे. |
| ३. | उपस्थिती नोंदवही | नोंदवही योग्य प्रकारे राखून अद्यावत केली आहे. |
| ४. | वेतन नोंदवही | नोंदवही योग्यप्रकारे राखून अद्यावत केली आहे. |

**८)** **संचालक मंडळ :**

- सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवड करण्यात आली आहे.
- सन २०१९-२० या आर्थिक वर्षात फेडरेशनच्या संचालक मंडळावर २२ संचालक सदस्य आहेत. (परिशिष्ट १ पहा.)

**९)** **अध्यक्ष व मुख्य कार्यकारी आणि सचिव :**

- आर्थिक वर्षात श्री.विद्याधर वा. अनास्कर हे अध्यक्ष व सौ. सायली संजय भोईर या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव आहेत.

**१०)** **लेखापरीक्षण वर्ग :**

फेडरेशनने केलेली वैधानिक पूर्तता, फेडरेशनचे उत्पन्न व खर्च, सभासद वर्गणी वसूली, निधी गुंतवणूक, फेडरेशनचे एकूण कामकाज, कायदेविषयक बाबींचा पाठपुरावा, समित्या व कर्मचाऱ्यांचे कामकाज, नियम व निकषांचे पालन, सभा व त्यांचे अनुपालन, प्रक्रियात्मक अनुपालन, सभासदांमध्ये वाढ इ. ची तपासणी केल्यावर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी आम्ही फेडरेशनला लेखापरीक्षण वर्ग 'अ' देतआहोत.

********

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

## भाग-ब

### खतावणी छाननी :

अ. देयता

१. राखीव आणि इतर निधी - रु.६,३५,९५,४६०.०७

| तपशील | शिल्लक ३१.०३.२०२० | शिल्लक ३१.०३.२०१९ | वाढ |
|---|---|---|---|
| राखीव निधी | ९२,५१,७५५.०० | ९०,६६,६४५.०० | १,८५,११०.०० |
| इमारत आणि विकास निधी | ३,०३,५९,७०१.०० | २,८७,०९,७०१.०० | १६,५०,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | ८१,६३,४६३.०७ | ६६,५८,८९०.०७ | १५,०४,५७३.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ४२,५१,५४१.०० | ३०,८८,३१४.०० | ११,६३,२२७.०० |
| लीजधारण जागेसाठी परिशोधन निधी | १४,२५,०००.०० | १३,७५,०००.०० | ५०,०००.०० |
| अप्रत्याशित आणि आकस्मिक दायित्व निधी | ५५,००,०००.०० | ३८,५०,०००.०० | १६,५०,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | ३०,४४,०००.०० | २०,४४,०००.०० | १०,००,०००.०० |
| गुंतवणूकीसाठी खास निधी | १६,००,०००.०० | - | १६,००,०००.०० |
| **एकूण** | ६,३५,९५,४६०.०७ | ५,४७,९२,५५०.०७ | ८८,०२,९१०.०० |

- आर्थिक वर्षाच्या कालावधीत राखीव व इतर निधीमध्ये रक्कम रु.८८,०२,९१०/- ची वाढ झालेली आहे.
- आर्थिक वर्षाच्या कालावधीत लीजधारण जागेसाठी परिशोधन (Amortization) निधीत रु.५०,०००/- वर्ग करण्यात आले आहेत, कारण सदर जागेचे मूल्यांकन (मूळ करार रक्कम) किंमत रु.३०,००,०००/- असून ६० वर्षांच्या कालावधीकरीता सदर जागा फेडरेशनला लीजवर देण्यात आली आहे. सबब सदर रक्कम ६० वर्षात समभागात विभागण्यात आली आहे.
- वर्षभरात रु.८६,००,०००/- च्या वाढाव्याचे खालीलप्रमाणे विनियोजन करण्यात आले आहे.

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| इमारत व विकास निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | १०,००,०००.०० |
| अप्रत्याशित आणि आकस्मिक दायित्व निधी | १५,००,०००.०० |
| गुंतवणूकीसाठी विशेष निधी | १६,००,०००.०० |

कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी आणि कर्मचारी रजा रोखीकरण निधीची तरतूद वास्तविक मूल्यांकनावर आधारित आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

२. **थकीत वर्गणीची तरतूद - रु.७१,१६,५८१/-**

वर्षभरात फेडरेशनने चालू वर्षाच्या वर्गणीसाठी रक्कम रु.२४,९२,२००/- ची तरतूद केली आहे. तसेच जुन्या थकीत वर्गणीमधून रु.१२,९९,६५६/- ची येणे वर्गणी वसूल करण्यात आली आहे. सदर थकीत वर्गणीचा वर्ष-निहाय तपशील 'व्यापारी येणी' मध्ये सविस्तर देण्यात आला आहे.

३. **देणे बाकी - रु.११,०७,४९१.५८**

आर्थिक वर्षातील देणे बाकी खर्चाच्या तरतूदीशी संबंधीत आहेत. (परिशिष्ट २ पहा.)

४. **आगाऊ वर्गणी - रु.१,८०,५७६.१८**

वरील रक्कम फेडरेशनला सदस्य बँकांकडून आगाऊ प्राप्त झालेली सभासद वर्गणी दर्शविते. सदर रक्कम ही सभासद बँकांकडून घेण्यात येणाऱ्या वार्षिक वर्गणी व इतर येणे रक्कमांशी तडजोड करुन निकाली काढण्यासाठी फेडरेशनने योग्य ती पावले उचलणे आवश्यक आहे. (परिशिष्ट ३ पहा.)

**ब) मालमत्ता**

१. **रोख रक्कम -**

वर्षाअखेर फेडरेशनकडे रोख रक्कम रु.१,०३,८८१/- होती. दि.३१.०७.२०२० रोजी रोख रक्कमेची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली असता ती रु.३,७५८/- शिल्लक असल्याचे आढळले व सदर रक्कम रोखवहीशी तंतोतंत जुळत होती.

२. **बँकेतील शिल्लक - रु.७७,७२,९०९.०४**

दि.३१ मार्च,२०२० अखेरपर्यंत सर्व बँक खात्यांची जुळवणी झाली आहे आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ कोणत्याही नोंदी प्रलंबित नाहीत. बँकेतील शिल्लक खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक बचत खाते | ८८,३१६.७० |
| २. | अपना सहकारी बँक बचत खाते | ७६,२२,३०९.३४ |
| ३. | यूको बँक बचत खाते | ६२,२८३.०० |

S. D. SATAM & CO. ★ BHANDUP MUMBAI ★ CHARTERED ACCOUNTANTS

## ३. गुंतवणूक - रु.५,२२,७१,५८४.००

फेडरेशनने विविध बँकांमधील मुदत ठेवींमध्ये खालीलप्रमाणे गुंतवणूक केली आहे :

| क्र. | बँकेचे नाव | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | अपना सहकारी बँक लि. | ८१,०००.०० |
| २ | भारत को-ऑप. बँक लि. | ६५,००,०००.०० |
| ३ | जीएस महानगर को-ऑप. बँक लि., मुंबई | १०,००,०००.०० |
| ४ | बेसीन कॅथोलिक को-ऑप. बँक लि. | १, १५,००,०००.०० |
| ५ | दि महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि., मुंबई | ३०,००,०००.०० |
| ६ | गोपीनाथ पाटील पारसिक जनता सहकारी बँक लि. | १५,००,०००.०० |
| ७ | पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि. | ८२,८४,७१६.०० |
| ८ | दि सातारा सहकारी बँक लि. | १९,०५,८६८.०० |
| ९ | एसव्हीसी को-ऑपरेटिव्ह बँक लि. | ३०,००,०००.०० |
| १० | दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. | २०,००,०००.०० |
| ११ | टीजेएसबी सहकारी बँक लि., ठाणे | ३०,००,०००.०० |
| १२ | दि एनकेजीएसबी को-ऑप. बँक लि. | १,०५,००,०००.०० |
| | **एकूण** | **५,२२,७१,५८४.००** |

- गुंतवणूकीशी संबंधीत सर्व मुदतठेव पावत्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली आणि त्यात कोणतीही अनियमितता आढळली नाही.
- सदर गुंतवणूक निबंधकांनी मंजूर केलेल्या उपविधीनुसार करण्यात आली आहे.
- गुंतवणूकीवर मिळणारे व्याज रु.५,५५,१७५/- ची योग्य रीतीने पुस्तकी नोंद करण्यात आली आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

४. **इतर ठेवी - रु.५८,७२८/-**

इतर ठेवी खालीलप्रमाणे आहेत :

| क्र. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | दूरध्वनी ठेव | ११,५००.०० |
| २. | बी.ई.एस.टी. ठेवी | ४१,६०३.०० |
| ३. | महानगरपालिका पाणी मीटर सुरक्षा ठेव | ५,६२५.०० |
| | **एकूण** | **५८,७२८.००** |

५. **व्यापारी येणी आणि इतर प्राप्तता - रु.७१,१६,५८१/-**

येणे सभासद वर्गणीचा वर्षनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे :

| थकबाकी | रक्कम रु. |
|---|---|
| १ वर्षापेक्षा कमी | २४,९२,२००.०० |
| १ वर्षापेक्षा जास्त | ४६,२४,३८१.०० |
| **एकूण** | ७१,१६,५८१.०० |

६. **स्थावर मालमत्ता - रु.१६,६२,६३२.९३**

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| फर्निचर आणि फिक्स्चर | ११,३९,१६५.१३ |
| कार्यालयीन वाहन | २,३३,१११.०० |
| विद्युत आणि कार्यालयीन उपकरणे | २,१४,४०६.०० |
| संगणक आणि छपाई यंत्र | ५१,३७३.०० |
| ग्रंथालयाची पुस्तके | २४,५७७.८० |
| **एकूण** | १६,६२,६३२.९३ |

- लेखापरीक्षण कालावधीत संगणक, कार्यालयीन उपकरणे आणि ग्रंथालयाच्या पुस्तकांमध्ये वाढ झालेली आढळून आली.
- घसारा वार्षिक पद्धतीने आकारला जातो.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

- दि.२४.०९.२०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रु.६००/- पेक्षा कमी किंमत असलेली व निष्क्रीय अवस्थेत असलेली मालमत्ता वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने निर्लेखित करण्याचा ठराव संमत करण्यात आला.
- दि.०१.०४.२०१९ रोजी निष्क्रीय अवस्थेत असलेली व रु.६००/- पेक्षा कमी असलेली मालमत्ता खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | मालमत्ता | ३१/०३/२०१९ रोजी रक्कम रु. | घसारा | ३१/०३/२०२० रोजी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | दूरध्वनी उपकरणे (५) | ३८५.०० | ५८.०० | ३२७.०० |
| २ | बाथरुम गीझर | ४४०.०० | ६६.०० | ३७४.०० |
| ३ | चहा बनविण्याचे मशीन | ३११.०० | ४७.०० | २६४.०० |
| ४ | दूरध्वनी उपकरणे | २८६.०० | ४३.०० | २४३.०० |
| ५ | संचालक मंडळ नामफलक | ५२२.०० | ५२.०० | ४७०.०० |
| ६ | टेबल (२) | ४२३.३० | ४२.०० | ३८१.३० |
| ७ | कपाट | ४३३.२४ | ४३.०० | ३९०.२४ |
| ८ | छताचा पंखा ४८'' क्रॉम्टन | २२२.०० | २२.०० | २००.०० |
| ९ | छताचा पंखा ४८'' ओरीएन्ट | २५१.०० | २५.०० | २२६.०० |
| १० | भिंतीवरचा पंखा | २०७.०० | २१.०० | १८६.०० |
| ११ | पाणी वापर मोजण्याचे यंत्र | ४०२.०० | ४०.०० | ३६२.०० |
| १२ | लॅन सेटींग (३१.०३.२००९) | ९३.०० | ३१.०० | ६२.०० |
| १३ | आकृती सॉफ्टवेअर (३ संगणक) | १७.०० | ६.०० | ११.०० |
| १४ | एचपी छपाई यंत्र -१८०० (८.६.२०१०) | ३५६.०० | ११९.०० | २३७.०० |
| १५ | मदर बोर्ड (९.०२.२०११) | १४१.०० | ४७.०० | ९४.०० |
| १६ | वायरलेस राऊटर (३०.०८.२०११) | ९८.०० | ३३.०० | ६५.०० |
| १७ | मुख्य कार्यकारी व सचिव यांच्या कॅबिनमधील लेझर छपाई यंत्र | २१८.०० | ७३.०० | १४५.०० |
| १८ | एचपी छपाई यंत्र -१०१० | २८१.०० | ९४.०० | १८७.०० |
| | एकूण | ५०८६.५४ | ८६२.०० | ४२२४.५४ |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

७. **इतर मालमत्ता - रु.१०,७१,६७४/-**

| तपशील | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|
| सणवारासाठी उचल | १४,४००.०० | |
| बी.एम.असोसिएशनकडून येणे बाकी असलेले पाणी, इतर सुविधा व वार्षिक लीज भाडे शुल्क | ८४४६.०० | |
| सेवा कर येणे बाकी | १,४०,८२४.०० | |
| आयकर मागणी | ४,२८,०३५.०० | |
| आगाऊ भरलेला विमा | १,०१०.०० | ४१,८६७/- |
| आगाऊ भरलेला वार्षिक देखभाल खर्च | ४०,८५७.०० | |
| भाड्याने दिलेल्या सभागृहाची येणे बाकी | १,६७,४००.०० | |
| सभासदांच्या येणे बाकी वर्गणीवरील वस्तू व सेवा कर | २४,२९०.०० | |
| येणे बाकी टी.डी.एस. | २,४६,४१२.०० | तपशील खालीलप्रमाणे आहे :<br>२०१४-१५ २१,२५०.००<br>२०१५-१६ १,४०३.००<br>२०१६-१७ २६,७७९.००<br>२०१७-१८ १८,६०६.००<br>२०१९-२० ६६,६६६.००<br>२०२०-२१ १,११,७०८.०० |

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

वैधानिक लेखापरीक्षक २०१९-२०

**क. आय-व्यय पत्रक:**

**आम्ही संबंधीत पावत्या तपासल्या असून आम्हाला त्या बरोबर आढळल्या आहेत.**

**३१.०३.२०२० रोजीचे आय-व्यय पत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| तपशील | ३१.०३.२०२० | ३१.०३.२०१९ | वाढ / (घट) | % बदल |
|---|---|---|---|---|
| उत्पन्न | | | | |
| सभासद वर्गणी | १,०३,५५,६५६.०० | ९५,७९,८१४.०० | ७,७५,८४२.०० | ८.१० |
| गुंतवणूकीवरील व्याज | ४५,११,७७७.०० | ४०,४८,७६८.५० | ४,६३,००८.५० | ११.४४ |
| इतर उत्पन्न | ४४,८४,०७६.०० | १९,०७,७०१.०० | २५,७६,३७५.०० | १३५.०५ |
| **एकूण उत्पन्न (अ)** | **१,९३,५१,५०९.००** | **१,५५,३६,२८३.५०** | **३८,१५,२२५.५०** | **२४.५६** |
| **खर्च** | | | | |
| कर्मचारी खर्च | ४९,२०,३८९.०० | ५२,८२,२४९.०० | (३,६१,८६०.००) | (६.८५) |
| संचालक मंडळ खर्च | ४,६७,०६८.०० | ५,९८,०७८.०० | (१,३१,०१०.००) | (२१.९१) |
| कार्यालयीन खर्च | ९,४४,४३८.०० | ९,३१,२६४.३० | १३,१७३.७० | १.४१ |
| शुल्क आणि कमिशन इ. | २,४१,२४८.५९ | १,९०,९४१.६३ | ५०,३०६.९६ | २६.३५ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा, विद्युत, घसारा इ.) | ८,०८,१७७.०० | ९,००,४९३.०० | (९२,३१६.००) | (१०.२५) |
| इतर खर्च | २५,७०,१८५.५४ | १३,९७,०५९.०० | ११,७३,१२६.५४ | ८३.९७ |
| **एकूण खर्च (ब)** | **९९,५१,५०६.१३** | **९३,००,०८४.९३** | **६,५१,४२१.२०** | **७** |
| **एकूण वाढावा (क = अ - ब)** | **९४,००,००२.८७** | **६२,३६,१९८.५७** | **३१,६३,८०४.३०** | **५०.७३** |
| **विविध निधीमध्ये वर्ग (ड)** | **८६,००,०००.००** | **५५,००,०००.००** | **३१,००,०००.००** | **५६.३६** |
| **निव्वळ वाढावा (इ = क - ड)** | **८,००,००२.८७** | **७,३६,१९८.५७** | **६३,८०४.३०** | **८.६७** |

मागील वर्षात प्राप्त झालेल्या वाढाव्याच्या तुलनेत, फेडरेशनच्या ढोबळ वाढाव्यात आर्थिक वर्षात रु.३१,६३,८०४.३० म्हणजेच रु.५०.७३% ने वाढ झाली आहे. सदर वाढ ही मुख्यत: सभासद वर्गणी, इतर उत्पन्न इ.मध्ये झालेली वाढ तसेच कर्मचारी खर्च, संचालक मंडळ खर्च आणि मालमत्ता खर्च यांच्या रक्कमेत झालेली घट इ. मुळे झाली आहे. तसेच फेडरेशनच्या इतर महत्त्वाच्या उत्पन्नामध्ये भाडेतत्त्वावर देण्यात आलेले निवासी कक्ष, सभागृह यांचे माध्यमातून प्राप्त झालेले भाडे, देणगी, प्रायोजकत्वाद्वारे प्राप्त झालेले उत्पन्न इ.चा समावेश आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

**विविध निधीमध्ये वर्गीकृत झालेल्या निधीचा तपशील खालील प्रमाणे आहे :**

| तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|
| इमारत आणि विकास निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | १५,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | १०,००,०००.०० |
| अप्रत्याशित आणि आकस्मिकदायित्व निधी | १५,००,०००.०० |
| गुंतवणूकीसाठी विशेष राखीव निधी | १६,००,०००.०० |
| **एकूण** | ८६,००,०००.०० |

**ड) कर्मचारी संबंधीत बाबी :**

**१. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी**

- वर्षभरात फेडरेशनने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी रु.३,७८,४८९/- चे योगदान दिले आहे.
- आम्ही भविष्य निर्वाह निधीचे चलन, वजावटी आणि त्याचा भरणा संस्थेने वेळेवर करण्यात आला असल्याची तपासणी केली व आम्हांस ते व्यवस्थित व वेळेवर केल्याचे आढळले आहे.

**२. ग्रॅच्युइटी**

- लेखापरीक्षा कालावधीत ग्रॅच्युइटी रक्कम रु.९५,४२७/- देण्यात आली.
- ग्रॅच्युइटीबाबतचे दायित्व वास्तविक आधारावर व मूल्यांकनावर करण्यात आले आहे.
- दि.३१.०३.२०२० रोजी रक्कम रु.१५,००,०००/- ची तरतूद ग्रॅच्युइटीकरिता करण्यात आली आहे.

**३. रजेचे रोखीकरण**

- लेखापरीक्षण कालावधीत अदा करण्यात आलेल्या रु.४,८८,७७३/- रक्कमेच्या रजेच्या रोखीकरणाची तपासणी करण्यात आली व आम्हाला ती व्यवस्थित आढळली आहे.
- रजेच्या रोखीकरणाकरिता विशेष तरतूद करण्यात आली आहे.
- दि.३१.०३.२०२० रोजी रु.१५,००,०००/- ची तरतूद रजा रोखीकरणाकरिता करण्यात आली आहे.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

********

## भाग क

**सामान्य निरीक्षणे -**

**प्रमुख निरीक्षणे -**

१) फेडरेशनची सध्याची कार्यालयीन जागा ही लीज तत्त्वावर असून त्यासाठी फेडरेशनने रक्कम रु.३० लाखांची ठेव ठेवली आहे. लीज करारानुसार, फेडरेशनला सदरहू जागा पोट-भाड्याने देण्याची परवानगी नाही. परंतु फेडरेशनने जागेचा काही भाग बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. ला भाड्याने दिला आहे आणि त्याकरिता ठेव म्हणून रु.७.४५ लाख सदर असोसिएशनकडून फेडरेशनला प्राप्त झाले आहेत.

२) मागील वर्षात फेडरेशनने, 'सेवाकर फेडरेशनला लागू होत आहे का?' या संदर्भात मा.आयुक्त, सेवाकर कार्यालय यांना पत्रव्यवहार करुन त्यांचा अभिप्राय मागवला होता व त्यानुषंगाने सदर कर फेडरेशनला लागू होत असल्याचे पत्र सेवाकर कार्यालयाकडून फेडरेशनला प्राप्त झाले होते. त्यानुसार फेडरेशनने सभासदांच्यावतीने सभासद वर्गणीवर सेवाकर भरला. परंतु अद्यापही फेडरेशनला काही सभासद बँकांकडून रु.१,४०,८२४/- रक्कमेचा सेवाकर येणे बाकी आहे. सदर रक्कम सर्वसाधारण सभेच्या पूर्वपरवानगीने निर्लेखीत करण्याचा सल्ला फेडरेशनला देण्यात येत आहे.

३) सभासदांकडून थकित सदस्यता शुल्क वसूल करण्यासाठी फेडरेशन सातत्याने प्रयत्न करीत आहे. या आर्थिक वर्षात फेडरेशनने मागील आर्थिक वर्षातील रु.१२,९९,६५६/- थकीत सभासद वर्गणी वसूल केली आहे.

